दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990






लातूर वर्ष ४ थे अंक १९० वा रविवार दि.१२ जानेवारी २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# आरपीआय लढवणार दिल्ली विधानसभा !

## १५ ठिकाणी उभे करणार उमेदवार



नवी दिल्ली : अरविंद केजरीवाल दिल्लीतील सत्तेला निरोप देतील, असे सांगतानाच केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी आरपीआय निवडणुकीत १५ जागांवर उमेदवार उभे करणार असल्याची घोषणा केली. रामदास आठवले म्हणाले, दिल्ली निवडणूकीमध्ये काही जागांवर उमेदवार निश्चित करण्यात आले आहे. तर उर्वरित जागांवर भाजप उमेदवारांना पाठिंबा देणार आहे.

दिल्लीत ऐतिहासिक बहुमताने भाजपचे सरकार स्थापन होणार असल्याचा विश्वास देखील त्यांनी व्यक्त केला. विधानसभा निवडणुकीत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आम आदमी पक्षाला सत्तेपासून दूर करण्यासाठी काम करेल आणि काँग्रेसला पुन्हा दिल्लीत शून्य जागा मिळवून देण्यासाठी काम करेल, असे रामदास आठवले म्हणाले.

देशाच्या राजधानीला जागतिक दर्जाचे शहर बनवण्याऐवजी भ्रष्टाचाराचे समूळ उच्चाटन करण्याचे आश्वासन देणाऱ्या आपने पोकळ घोषणा केली आहे. जागतिक दर्जाच्या शाळा बांधण्याचा दावा करणाऱ्या केजरीवाल यांनी दोन लाखांहून अधिक मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवले आहे. दारू घोटाळ्याने संपूर्ण दिल्लीला बदनाम करण्याचे काम अरविंद केजरीवाल यांनी केले आहे. उमेदवार विधानसभा निवडणुकीत विजयी झाल्यानंतर सरकार स्थापन करण्यासाठी भाजपला पाठिंबा देईल, असे त्यांनी सांगितले.

# सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचा १२ जानेवारी रोजीचा लातूर दौरा

लातूर, दि. ११ : राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील हे रविवार, १२ जानेवारी २०२४ रोजी लातूर जिल्हा दौऱ्यावर आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.


सहकार मंत्री ना. पाटील हे १२ जानेवारी रोजी सकाळी ९ वाजता शिरूर ताजबंद येथील इंद्रायणी निवास येथे कार्यकर्त्यांच्या भेटी घेतील. सकाळी ९.४५ वाजता शिरूर ताजबंद येथून अहमदपूरकडे प्रयाण करतील. सकाळी १० वाजता अहमदपूर येथे राष्ट्रमाता माँसाहेब जिजाऊ जयंती कार्यक्रमाला उपस्थित राहतील. सकाळी १०.१५ वाजता अहमदपूर येथील संस्कृती मंगल कार्यालय येथे मराठवाडा साहित्य परिषदेच्या कार्यक्रमाला उपस्थित राहतील. सकाळी १०.३० वाजता भागीरथी हॉटेलसमोरील बापू मेन्स वेअर शुभारंभ कार्यक्रमाला उपस्थित राहतील. सकाळी ११ वाजता सानवी मंगल कार्यालया शेजारी सदगुरू एन्टरप्राईजेसच्या उद्घाटन समारंभाला उपस्थित राहतील.

ना. पाटील हे सकाळी ११.३० वाजता चाकूर येथील भाई किशनराव देशमुख विद्यालय येथे चाकूर सिटी प्रेस क्लब पत्रकार पुरस्कार वितरण कार्यक्रमाला उपस्थित राहतील. दुपारी २ वाजता लातूर येथील दिवाणजी मंगल कार्यालय येथे महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ अधिवेशनाला उपस्थित राहतील. दुपारी ४.३० वाजता लातूर येथून शिरूर ताजबंद येथील इंद्रायणी निवास येथे आगमन व राखीव.

# महाविकास आघाडीकडे आमचे लक्ष नाही

नागपूर : महाविकास आघाडी एकत्र लढणार की, वेगळी लढणार याकडे आमचे लक्ष नसून महाराष्ट्राला प्रगतीकडे नेण्याचा आमचा प्रयत्न आहे, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. शनिवार, ११ जानेवारी रोजी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका उबाठा गटाने स्वबळावर लढवण्याची घोषणा केली आहे. यावर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाविकास आघाडी एकत्र लढणार, वेगळे लढणार, राहणार की, तुटणार याकडे आमचे लक्ष नाही. महाराष्ट्राला प्रगतीकडे नेण्याचा आमचा प्रयत्न आहे. पुढच्या सगळ्या निवडणूकांमध्ये जनतेचा आशीर्वाद आमच्या सोबत राहील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूरमधील दोन्ही शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या कामाची पाहणी केली. ते म्हणाले की नागपूरमधील दोन्ही वैद्यकीय महाविद्यालये अत्यंत जुनी आहेत. जीएमसी तर एकेकाळी आशियातील सर्वात मोठे मेडिकल कॉलेज म्हणून गणले जात होते. त्यामुळे मागच्या काळात याचा एक मास्टरप्लान तयार करून १ हजार कोटी रुपये देऊन अद्ययावत व्यवस्था तयार होण्यासंदर्भात काम सुरु केले होते.

# राष्ट्रीय युवा दिनानिमित्त स्वयमतेज अकॅडमी लातूर येथे विद्यार्थ्यांनी घेतला वाचनाचा संकल्प



लातूर / प्रतिनिधी : – जगमंगल सोशल फाऊंडेशन संचलित स्वयमतेज अकॅडमी लातूर येथे राष्ट्रीय युवा दिनाचे औचित्य साधत वाचन प्रेरणा दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. या विशेष प्रसंगी विद्यार्थ्यांनी दोन तासांचे सामूहिक वाचन करून वाचन संस्कृतीला उजाळा दिला. कार्यक्रमाला हरिती वाचन चळवळीचे प्रेरणास्थान व सामाजिक कार्यकर्ते राहुल लोंढे आणि सुप्रसिद्ध पत्रकार डॉ. सीतम सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना वाचनाच्या महत्त्वाबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. वाचनाच्या माध्यमातून व्यक्तिमत्त्व विकास, विचारांची स्पष्टता आणि ज्ञानार्जनाची प्रक्रिया कशी साध्य होऊ शकते, यावर त्यांनी भर दिला. कार्यक्रमाला उपस्थित प्रमुख पाहुण्यांमध्ये पत्रकार डॉ. सीतम सोनवणे हरिती वाचन चळवळीचे राहुल लोंढे स्वयंमतेज अकॅडमीचे संचालक आकाश सोनकांबळे, प्रशिक्षक किशोर महाजन, आजम पठाण, वैष्णवी मोरे आणि रेणुका होनकर यांचा समावेश होता. कार्यक्रमास विद्यार्थ्यांनीही मोठ्या संख्येने हजेरी लावून वाचनप्रेरणेचा लाभ घेतला. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी वाचनाचा संकल्प करून या चळवळीत सक्रिय सहभागी होण्याचा निर्धार केला. वाचन प्रेरणा दिवसाच्या निमित्ताने वाचनाची गोडी विद्यार्थ्यांमध्ये रुजवण्याचा उपक्रम अत्यंत कौतुकास्पद ठरला.

# जिल्हास्तरीय विधीज्ञ स्पर्धांचे शानदार उद्घघाटन





लातूर / प्रतिनिधी :– लातूर जिल्हा वकील मंडळाच्या वतीने संविधान रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित जिल्हास्तरीय बॅडमिंटन, जलतरण, कॅरम, बुद्धिबळ, चेस, टेबल टेनिस, कबड्डी व क्रिकेट स्पर्धांचे उदघाटन महाराष्ट्र व गोवा वकील परिषद मुंबई सदस्य अँड अण्णाराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले आहे तर यावेळी प्रमुख उपस्थिती माजी नगराध्यक्ष अँड व्यकटराव बेंद्रे, रोटरी क्लबचे अँड जांबुवंतराव सोंनकवडे, अँड आशिष बाजपाई, अँड मधूकर राजमाने, अँड चंद्रकांत आगरकर, जिल्हा सरकारी वकील अँड संतोष देशपांडे, माजी जिल्हा न्यायाधीश अँड आर वाय शेख आदींची उपस्थिती होती संत तुकाराम विद्यालयाच्या मैदानावर क्रिकेट स्पर्धा आज सुरू झाल्या आहेत तर उर्वरित स्पर्धा दयानंद महाविद्यालय क्रीडा प्रबोधनी, एस एम आर स्विमिंग पुल आदी ठिकाणी दिनांक ११.१२.१९ जानेवारी रोजी स्पर्धा होणार आहेत तर पारितोषिक वितरण दि.२६ जानेवारी २०२५ रोजी होणार आहेत. सर्व न्यायिक अधिकारी, कर्मचारी, विधिंज्ञ यांच्यातील निकोप वातावरणासाठी, खेळाडूवृत्तीला प्रोत्साहन देण्यासाठी प्रतिवर्ष स्पर्धा आयोजित केल्या जातात. विविध स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी साठी लातूर जिल्हा वकील मंडळाचे अध्यक्ष अँड शरद इंगळे उपाध्यक्ष अँड मनीषा दिवे पाटील, अँड आनंद खांडेकर, सचिव अँड प्रदिपसिंह गंगणे, ग्रंथालय सचिव अँड विजय साबळे, सहसचिव अँड नरेश कुलकर्णी अँड तृप्ती इटकरी, कोषाध्यक्ष अँड रोहित सोमवंशी, अँड डी पी नागरगोजे,अँड वैभव बिराजदार, अँड तेजस्वी जाधव, अँड अतीक शेख, अँड सुहास पाटील,अँड हंसराज साळुंखे, श्री सुशील सुर्यवंशी, श्री प्रकाश मसलगे, विष्णू जाधव, आकाश केंद्रे आदी परिश्रम घेत आहेत

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे मार्फत यशस्वी प्रशिक्षणार्थींचा गौरव



पुणे / प्रतिनिधी :– दि. ९ जानेवारी रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे येथे अनुसूचित जातीच्या युवक–युवती करीता टाटा स्ट्राईव्ह यांच्यामार्फत राबविण्यात आलेल्या विविध कार्यक्रमातील यशस्वी प्रशिक्षणार्थ्यांचा सत्कार समारंभ कार्यक्रमात गौरव करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे ही महाराष्ट्र सरकारच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अंतर्गत असलेली एक स्वायत्त संस्था आहे, तसेच टाटा स्ट्राईक हा टाटा कम्युनिटी इनिशिएटिव्ह ट्रस्ट (ढउखढ) च्या टाटा स्ट्राइव्ह अंतर्गत असलेला महत्वकांक्षी कौशल्य विकास उपक्रम आहे. बार्टी व टाटा स्ट्राइव्ह यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील युवक– युवतीकरिता विविध प्रकारचे अनिवासी प्रशिक्षण कार्यक्रम पुणे व पुणे (नन्हे) नाशिक, नागपूर, ठाणे, मुंबई, तळोजा, इ. ठिकाणी राबविण्यात आले असून त्याद्वारे प्रशिक्षणार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झालेल्या आहेत. सदर कार्यक्रम बार्टीचे महासंचालक श्री. सुनील वारे अध्यक्षतेखाली पार पडला कार्यक्रमाकरिता श्रीमती इंदिरा अस्वार, (निबंधक) श्री. दादासाहेब गित्ते (कौशल्य विकास व प्रशिक्षण विभाग प्रमुख) श्रीमती स्नेहल भोसले (योजना विभाग प्रमुख), श्रीमती. प्रज्ञा मोहिते (कार्यालय अधिक्षक), श्री.महेश गवई (प्रकल्प व्यवस्थापक), कौशल्य विकास विभागातील इतर कर्मचारी व टाटा स्ट्राईव्ह या संस्थेमार्फत श्री. मयुर पिल्लेवार, श्री. करण कदम, श्री. राहुल सपकाळ, श्री. विरेन यादव, श्रीमती. सुषमा गायकवाड, व यशस्वी प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. महासंचालक यांच्या हस्ते उपस्थित यशस्वी प्रशिक्षणार्थ्याना प्रमाणपत्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे खंड व भेट वस्तू देण्यात आल्या. टाटा स्ट्राइव्हचे श्री. मयुर पिल्लेवार यांनी टाटा स्ट्राइव्ह मार्फत प्रशिक्षणार्थ्यांना कशा पध्दतीने प्रशिक्षण दिले जाते व या प्रशिक्षणामुळे जास्तीत जास्त प्रशिक्षणार्थ्याना रोजगाराचा संधी प्राप्त झाल्या आहेत याची माहिती दिली. तसेच प्रशिक्षणार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना बार्टी मार्फत राबविण्यात आलेल्या प्रशिक्षाणामुळे त्यांना रोजगाराच्या संधी प्राप्त होऊन त्याद्वारे त्यांना चांगला पगाराचा नोक–या प्राप्त झाल्याने त्यांच्या आर्थिक, सामजिक, वैचारिक जीवनात मोठा बदल झाला असल्याचे सांगितले. यावेळेस श्री. सुनील वारे, महासंचालक यांनी विद्यार्थ्यां विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या.



## संपादकीय....

# स्वबळावर लढावे लागणार

दिल्ली विधानसभा निवडणुकीचे नगारे वाजू लागले आणि आघाडीतील सहभागी नेत्यांचे मुखवटे गळू लागले. खरे चेहरे पुढे आले. पंजाब विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाला धोबीपछाड दिल्यापासून 'आप'चे घोडे चौखूर होते. पुन्हा दिल्ली काबीज करण्यासाठी आणि आपला एकछत्री अंमल राहावा, या उद्देशाने 'आप'ने दिल्ली विधानसभा निवडणूक स्वबळावर लढण्याची घोषणा केली आणि आघाडीला पहिला तडाखा बसला.

काँग्रेसचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी 'आप' आणि 'काँग्रेस' एकत्र लढले असते तर बरे झाले असते, अशी प्रतिक्रिया दिली आहे. ती काँग्रेसच्या मानसिकतेचेच निदर्शक म्हटली पहिजे. आता दिल्लीत 'आप', भाजप आणि काँग्रेस अशी तिरंगी लढत होईल. त्यात भाजपला अधिक फायदा होण्याची शक्यता आहे. 'आप' आणि काँग्रेस एकत्र लढले असते, तर कदाचित वेगळी परिस्थिती निर्माण झाली असती. पण मद्य घोटाळा प्रकरणात तुरुंगात जाऊन आल्याने आपण जणू पुण्यपावन झालो, अशा थाटात वावरणार्या केजरीवाल यांनी दिल्ली जिंकलीच, अशा थाटात वावरत काँग्रेसशी हातमिळवणीचा विचारही केला नाही. लोकसभेत चांगले यश मिळवणार्या काँग्रेस पक्षाला महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत जबरदस्त धक्का बसला. धुव्वा उडाला. या दारुण पराभवानंतर काँग्रेस नेतृत्वाविषयी आणि एकूणच इंडिया आघाडीच्या उपयुक्ततेविषयी सहभागी पक्षनेतृत्वात उलटसुलट चर्चा सुरू झाली आणि पाहता पाहता जवळजवळ सारेच पक्ष काँग्रेस विरोधात गेले. आपण आघाडीचे नेतृत्व करू शकतो, असे तृणमूलच्या सर्वेसर्वा ममतादीदी यांनी जाहीर केले आणि मग धरण फुटावे, त्याप्रमाणे एकेक नेत्यांना वाचा फुटत गेली. केजरीवाल त्यात आघाडीवर होते. पाठोपाठ इतरांनीही त्यांची री ओढली.

ममतादीदी यांनी आता दिल्ली निवडणुकीत 'आप'ला पाठिंबा जाहीर केला आहे, तर समाजवादी पार्टीचे सर्वेसर्वा अखिलेश यादव यांनीही 'आप'ला आपले समर्थन दिले आहे. उत्तर प्रदेशात काँग्रेसशी सहा महिन्यांपूर्वी हातमिळवणी करणार्या यादव यांनी आपली टोपी फिरवली आहे. त्यानंतर आता नॅशनल कॉन्फरन्सचे ओमर अब्दुल्ला यांनीही अप्रत्यक्ष 'आप'ची पाठराखण केली आहे. बिहारमध्ये लालूप्रसाद यादव यांचा राष्ट्रीय जनता दल पक्ष काँग्रेसबरोबर आहे. दोघे एकत्र निवडणूक लढवत आले आहेत. पण आता पित्यापाठोपाठ पक्षाची सूत्रे हाती घेतलेल्या तेजस्वी यादव यांनी इंडिया आघाडी संपुष्टात आल्याचे खळबळजनक विधान केले आहे. बिहारमध्ये विधानसभा निवडणुका होऊ घातल्या आहेत. त्यावेळी काँग्रेसचा हात न पकडण्याचे तेजस्वी यादव यांचे धोरण दिसते. आघाडी तर फुटण्याचीच चिन्हे आहेत. परत बिहारमधील आपला साथीदार पक्ष गमावणे हा काँग्रेसला मोठा धक्काच आहे.पक्षाचे महाराष्ट्रातील सहकारी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरद पवार) सर्वेसर्वा शरद पवार यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्वयंसेवकांनी विधानसभेच्या निवडणुकीत केलेल्या कामगिरीची तोंड भरून प्रशंसा केली आहे, तर शिवसेना ठाकरे गटाने दिल्लीत 'आप'ला पाठिंबा दिला आहे. महाराष्ट्रातील हे काँग्रेस पक्षाचे दोन सहकारी पक्ष कोणत्या दिशेने चालले आहेत किंवा कोणत्या विचारात आहेत, हे वेगळे सांगण्याची गरज नाही.संसद अधिवेशनात उद्योगपती अदानींसंदर्भात काँग्रेस पक्षाने केंद्र सरकारला घेरण्याचा प्रयत्न केला; पण इतर विरोधी पक्षांनी काँग्रेस पक्षाला एकाकी पाडले होते. इंडिया आघाडीतील फूट तेव्हाच नजरेला आली होती. आता फक्त औपचारिकताच शिल्लक राहिली आहे. काँग्रेसला पुन्हा 'एकला चलो रे'ची भूमिका बजावावी लागणार, असे दिसत आहे. स्वबळावर लढण्याचे आव्हान पक्षाला पेलावे लागणार आहे.

# बुध्दि सामर्थ्य प्रतिभावान : स्वामी विवेकानंद

शतकानुशतके आपल्या समाजात असे महान पुरुष निर्माण होत आले आहेत. त्यांच्या पैकी प्रत्येकजण विश्वविचाराच्या क्षितिजावर उदयास आलेला तेजस्वी आणि स्वयंप्रभ असा तारा आहे. केवळ मानवजातीच्या सुख–दुखा:शी नव्हे, तर समस्त चराचर सृष्टीशी तादम्य पावलेले रामकृष्ण परमहंसासारखे अनेक तेजस्वी सत्पुरुष आजही या समाजात निर्माण होत आहेत. एकदा तर एका गाईला चाबकाचे फटके बसत असलेले पाहुन रामकृष्णाच्या तोंडून वेदनेचे चित्कार बाहेर पडले. इतकेच नव्हे तर, त्यांच्या पाठीवर वळही उठले. एकदा तर हिरव्यागार कुरणात चरत असलेल्या बैलाच्या खुराचेही ठसे त्यांच्या छातीवर उमटलेले दिसले. आत्मज्ञानाचा उपदेश करणाऱ्या आपल्या येथील थोर पुरुषांची तादाम्यवृत्ती कोणत्या थरापर्यंत पोचली होती, हे यावरुन स्पष्ट होईल.



ब्राम्हो समाजाच्या प्रभावामुळे नरेंद्र ब्राम्हो समाजाकडे आकृष्ट झाले. त्यात मूर्तिपूजा नव्हती अंधश्रध्दा नव्हती, कर्मकांड नव्हते, स्त्रीयांना शिक्षण दिले पाहिज. हे विचार ऐकून त्यांच्या मनात गोंधळ माजला ''देव खरच आहे की नाही ? असल्यास कोठे भेटेल ? त्याची भेट कोण घडवू शकेल? अशा नानाविध प्रश्नांनी, विचारांनी त्यांचे मन अस्वस्थ झाले. ब्राम्हो समाजाचे नेते देवेन्द्र यांनी त्यांच्या प्रश्नांचे समाधानकारक उत्तर ही देऊ शकले नाहीत. तेव्हा कॉलेजचे प्राचार्य हेस्टी यांनी त्यांना रामकृष्ण परमहंस यांच्याकडे पाठविले. रामकृष्ण परमहंसानी तीक्ष्ण दृष्टीने त्यांच्या डोळयांकडे पाहिले. ते आपल्या भक्तांना म्हणाले ''हा नरेंद्र मानवजातीच्या उध्दारासाठी जन्मला आहे, तो हिंदु धर्म आणि हिंदुस्थानची मान साऱ्या जगात उंचावेल''! नरेंद्राला ते खरे वाटेना. त्याने रामकृष्णांना विचारले, ''तुम्ही देव पाहिला आहे का''? नरेंद्राने विचारले, ''तेव्हा तुझ्या मनाला देवाच्या भेटीची तळमळ लागेल तेव्हा रामकृष्ण म्हणाले. हयावर त्यांचा विश्वास बसेना, तेव्हा रामकृष्णांनी त्यांच्या हदयाला स्पर्श केला. त्याचबरोबर सर्वत्र तेजाचे लोळ सर्वत्र उठले. प्रकाश पसरला. नरेंद्राच्या हदयातही प्रकाश पसरला. त्यांना सर्वत्र परमेश्वरच दिसू लागला ! तेव्हापासुन नरेन्द्र रामकृष्णांचे पटशिष्य म्हणुन ओळखल्या जाऊ लागले. त्यांच्या मध्ये असलेल्या बुध्दिचातुर्याने, ओजस्वी वाणीने जनमानसावर प्रभाव पाडु शकले. तेव्हापासुनच जमाव त्यांच्या पाठीमागे असायचा. कारण त्यांनी रामकृष्ण परमहंसाचे शिष्यत्व पत्करले होते.

बंगाली व इंग्रजी भाषेवर प्रभुत्व असलेले नरेंद्र अभ्यासूवृत्ती व हिंदु धर्माविषयी चिकित्सक वृत्ती तत्वज्ञान याची सांगड घालतांना ते कधीही विचलित झाले नाहीत. लहानपणापासून पुराण, रामायण–महाभारत सुध्दा ऐकण्याची खुप आवड होती. रामायण–महाभारतातील प्रसंग सांगुन त्यांच्या मनावर कोरीव असे काम केले. त्यामुळे त्यांनी खुप हुशारीने उपरोक्त प्रसंग आत्मसात करुन त्याचा व्याख्यानातून देशोदेशी प्रचार व प्रसार केला. त्यामुळे त्यांची विद्वता किती प्रखर होती, यावरुन सिध्द होते. एका वर्षात त्यांनी अमरकोश पाठ केला. यावरुन त्यांची बुध्दि किती तल्लख होती याची कल्पना येते. जागतिक इतिहास, संस्कृत, तत्त्वज्ञान हा विषयांचा त्यांनी अभ्यास केला. ते नेहमी विवेकवादाचा पुरस्कार करणारे असल्यामुळे विवेकवादाने माणुस समृध्द होतो, अशी त्यांची धारणा होती. कारण माणुस विवेकवादाने सत्यापर्यंत पोचतो ते यावरुन लोक पुढे त्यांना स्वामी विवेकानंद म्हणून लागले. त्यांनी १८९० साली रामकृष्णांच्या पत्नी शारदादेवी यांचा आर्शीवाद घेतला. ते मठातून बाहेर पडले, स्वामी विवेकानंद कन्याकुमारीला पोहचले. तेथील देवालयात त्यांनी ध्यानसाधना सुरु केली. त्यांना रामकृष्णांनी साक्षात दर्शन दिले व अमेरिकेत भरणाऱ्या जागतिक धर्म संसदेस जाण्याची आज्ञा केली.

नरेंद्राला गुरुकडून योग्य मार्ग मिळाला होता आणि म्हणुन त्या मार्गानेच जाण्याचा पक्का निर्धार केला होता. थोडयाच दिवसांनी रामकृष्ण ला कॅन्सरने ग्रासले. त्यांना उपचारासाठी काशीपूर येथे नेले. त्यांच्या सेवेसाठी नरेंद्रही त्यांच्या सोबत होते. रामकृष्ण त्याला म्हणाले, ''बेटा, माझी सर्व योगशक्ती मी तुला दिली आहे. त्याच्या जोरावर तू हिंदु धर्म आणि तत्त्वज्ञान यांचा जगभर प्रसार कर, आपल्या राष्ट्राचा उध्दार कर ! एवढे बोलून १५ ऑगस्ट १८८६ रोजी रामकृष्णांनी जगाचा निरोप घेतला. सर्व भारत फिरुन बघावा अशी त्यांना इच्छा झाली. त्याप्रमाणे ते प्रवासाला निघाले. काशी, अयोध्या, गया, आग्रा, वृन्दावन असे करत करत सर्व भारतभर त्यांनी पायी भ्रमण केले. आजही त्यांच्या शिष्यांची पायपीट सुरु आहे.

हिंदुधर्म, तत्वज्ञान यांच्या प्रचारादरम्यान त्यांनी न्यूयॉर्कमध्ये अभ्यासवर्ग सुरु केले. अनेक स्त्री–पुरुष त्यांचे शिष्य झाले. हिंदुधर्म, तत्त्वज्ञान याचा त्यांनी जगभर प्रसार केला. त्यासाठी देशात अनेक ठिकाणी त्यांनी रामकृष्ण मठ स्थापन केले. रामकृष्णांची भविष्यवाणी खरी ठरली त्यांचे शिष्य नरेंद्र उर्फ स्वामी विवेकानंद यांनी जगभर वेदान्ताचा प्रसार केला. स्वामी विवेकानंदांची कीर्ती देश–विदेशात पसरली होती. ही एक वेळची गोष्ट आहे. विवेकानंद समारंभासाठी परदेशात गेले होते. आणि त्यांच्या समारंभात अनेक परदेशी उपस्थित होते. त्यांनी दिलेले भाषण ऐकून एक विदेशी महिला खूप प्रभावित झाली. आणि ती विवेकानंदांकडे आली आणि स्वामी विवेकानंदांना म्हणाली की मला तुमच्याशी लग्न करायचे आहे जेणेकरून मला तुमच्यासारखा तेजस्वी पुत्र मिळावा. यावर स्वामी विवेकानंद म्हणाले तुम्हाला माहिती आहे का? की मी संन्यासी आहे मी लग्न कसे करू, तुला पाहिजे तर मला तुझा मुलगा बनवा. यामुळे माझी निवृत्ती तुटणार नाही आणि तुलाही माझ्यासारखा मुलगा मिळेल. हे ऐकून ती विदेशी महिला स्वामी विवेकानंदांच्या पाया पडली आणि म्हणाली की तुम्ही धन्य आहात. तुम्ही देवासारखे आहात! जे कोणत्याही परिस्थितीत आपल्या धर्माच्या मार्गापासून दूर जात नाहीत. म्हणजे किती अटळ श्रध्दा असावी विवेकानंद मध्ये जी ढळू देत नाही.

त्यानुसार ३१ मे १८९३ रोजी स्वामी अमेरिकेला निघाले. त्यांनी रामकृष्णांच्या फोटोला वंदन केले, कालीमातेचे स्मरण केले. भगव्या रंगाचा पोषाख, त्याच रंगाचा फेटा बांधला. भगवतगीता हाती घेऊन त्यांनी बोटीवर पाय ठेवला. चीन, जपान ओलांडून स्वामी अमेरिकेतील शिकागो बंदरात उतरले. ११ सप्टेंबर १८९३ रोजी जागतिक धर्म संसदेत भारताचे प्रतिनिधीत्व केले. सुरु झाली. सहा–सात हजार प्रतिनिधी जमले होते. देशोदेशीचे ध्वज फडकत होते. ख्रिस्ती धर्माचेच लोक जास्त असल्यामुळे ख्रिस्ती धर्माचेच गुणगान करीत होते. शेवटी स्वामींना पाचारण करण्यात आले. प्रथम ते घाबरले, मग धीर धरुन त्यांनी भाषणाला सुरुवात केली. माझ्या अमेरिकन बंधु–भगिनींनो! या त्यांच्या पहिल्या वाक्याला श्रोत्यांनी टाळयांचा कडकडाट केला. तो तब्बल दोन मिनिटे चालला व आपल्या ओजस्वी शैलीत त्यांनी हिन्दु धर्माची श्रेष्ठता श्रोत्यांना पटवून दिली, अमेरिकेत वास्तव्यात असतांना त्यांनी हिंदू धर्माचा, विश्वबंधुत्वाचा महान संदेश तेथील लोकांपर्यंत पोहचविला. त्यामुळे श्रोते मंत्रमुग्ध झालेत, आणि त्यांचा जयघोष करु लागले.

भारताचे नाव उज्वल केले ! १८९७ साली स्वामी विवेकांनद भारतात परत आले. १ मे १८९७ रोजी त्यांनी रामकृष्ण मिशनची स्थापना करुन लोकसेवेला सुरुवात केली, त्यात त्यांनी अनाथालय, धर्मार्थ रुग्णालय, वस्तीगृहाची स्थापना करुन मानवसेवा हाच खरा धर्म आहे हीच शिकवण त्यांनी पुढे रेटली ती आजतागायत सुरु आहे. त्यांच्या शिष्यांनी आणि अनुयायांनी त्यांच्या स्मरणार्थ तेथे एक मंदिर बांधले आणि विवेकानंद त्यांचे गुरु रामकृष्ण यांचा संदेश प्रसारित करण्यासाठी जगभरात १३० हून अधिक केंद्रे स्थापन केली. त्यांची एक सुप्रसिद्ध म्हण होती, जागे व्हा ! जोपर्यंत ध्येय साध्य होत नाही तोपर्यंत थांबू नका. ४ जुलै १९०२ रोजी ध्यानातच ब्रम्हरंध छेदून महासमाधी घेतली अशा तत्वज्ञानाच्या गाढ देशभक्ताला विनम्र आदरांजली !

----------------

प्रविण बागडे
नागपूर
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९

# कारभार हाताळण्यात अपयशी

लिबरल पार्टी ऑफ कॅनडाचे १२ वर्षे नेतृत्व केल्यानंतर पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांनी अखेर पंतप्रधान व नेतेपदाचा राजीनामा देण्याचा निर्णय घोषित केला आहे. काही दिवसांपूर्वीच अर्थमंत्री ख्रिस्तिया फ्रीलँड यांनी अचानक राजीनामा दिल्यामुळे मंत्रिमंडळात नाराजी असल्याचे स्पष्ट झाले होते. डोनाल्ड ट्रम्प यांच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या पहिल्या कार्यकाळात 'नॉर्थ अमेरिकन फ्री ट्रेड ॲग्रीमेंट'वरून कॅनडाचे अमेरिकेशी मतभेद झाले होते. तेव्हा ते सोडवण्यात ख्रिस्तिया यांनी महत्त्वाची भूमिका निभावली होती. या पार्श्वभूमीवर कॅनेडियन संसदेचे कामकाज २७ जानेवारीला सुरू होणार होते. पण आता ते २४ मार्चपर्यंत स्थगित करण्यात आले असून, त्यामुळे सत्ताधारी लिबरल पक्षाला नेता निवडीसाठी वेळ मिळणार आहे. तोपर्यंत ट्रुडो यांच्याकडेच कारभार असेल. कॅनडामध्ये तीन प्रमुख विरोधी पक्ष असून, संसदेचे कामकाज सुरू होताच सरकारविरोधात अविश्वास ठराव मांडण्याचा त्यांचा इरादा आहे. त्यात पक्षांतर्गत विरोध सुरू झाल्यामुळे ट्रुडोंना पंतप्रधानपदावर राहणे कठीण झाले होते. ट्रुडो यांचे वडीलही १९६८ ते १९८४ या काळात सत्तेवर होते आणि त्यांची तुलना अमेरिकेचे माजी अध्यक्ष जॉन एफ. केनेडी यांच्याशी केली जात असे. मी आव्हानांसमोर झुकत नाही, पण देशवासीयांचे हित आणि लोकशाही मूल्यांसाठी मी राजीनाम्याचा निर्णय घेतला आहे, असे ट्रुडो यांनी म्हटले असले तरी परिस्थितीसमोर त्यांना शरण जावे लागले आहे, ही वस्तुस्थिती आहे.



२०१५ मध्ये ट्रुडो पंतप्रधान झाले, तेव्हा त्यांची लोकप्रियता शिखरावर होती. पण डिसेंबर २०२४ मध्ये ती २२ टक्क्यांपर्यंत घसरली. लिबरल पार्टीला असलेल्या पाठिंब्याची टक्केवारी तर १६ टक्क्यांवर आली. प्रत्यक्ष निवडणुकीत हीच टक्केवारी राहिल्यास १५७ वर्षांत झाला नव्हता इतका लिबरल पार्टीचा दारुण पराभव होईल, अशी भीती व्यक्त झाली. ट्रुडो यांच्या दुसर्या कार्यकाळात कॅनडाचा आर्थिक विकास दर घसरला, बेरोजगारी वाढली, महागाईचा दर जास्त राहिला. घरांचे भाव इतके फुगले की, सर्वसामान्यांच्या ते हाताबाहेर गेले. त्याचवेळी ट्रुडो सरकारच्या भानगडी बाहेर येऊ लागल्या. या सरकारमधील काही मंत्र्यांचा कारभार आणि व्यवहार ठीक नव्हता. खुद्द ट्रुडो यांनी धनिकांकडून महागड्या भेटी स्वीकारल्या, उद्योगपतींनी त्यांना अनेकदा फुकटात हेलिकॉप्टर प्रवास घडवला तसेच त्यांच्या खासगी सहलींचा खर्चही उचलला. त्यामुळे सरकारच्या नैतिकतेवर लक्ष ठेवणार्या यंत्रणेने त्यांच्यावर कोरडे ओढले. कॅनडामधील 'डब्ल्यूई चॅरिटी' या संस्थेला सरकारने सुमारे दोन कोटी कॅनेडियन डॉलरचे कंत्राट दिले होते. याच संस्थेने ट्रुडो यांच्या कुटुंबीयांना लाखो डॉलर दिल्याचेही उघडकीस आले. २०२१ मध्ये तर बेपत्ता बालकांच्या स्मरणार्थ कॅनडात आवर्जून पाळल्या जाणार्या २५ मे या आंतरराष्ट्रीय स्मृतिदिनी ट्रुडो हे कुटुंबीयांसह पर्यटनाची मजा लुटत असल्याचे निदर्शनास आले. कॅनडामध्ये हजारो स्थलांतरितांना थारा दिला जातो; पण कोरोनानंतर सरकारच्या या धोरणास जनतेतून विरोध होऊ लागला. मागच्या सार्वत्रिक निवडणुकीत लिबरल पार्टीला एकूण ३३८ जागांपैकी केवळ १५३ जागा मिळाल्या. त्यांचे सरकार सत्तेवर आले, ते ब्लॉक क्युबेक्वा आणि जगमित सिंग यांच्या न्यू डेमॉक्रॅटिक पार्टीच्या बळावर. याचा अर्थ, या सरकारला इतरांच्या टेकूवर उभे राहणे भाग पडले होते.

अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदी पुन्हा ट्रम्प निवडून आल्यावर जी परिस्थिती उद्भवणार आहे, ती हाताळण्यास ट्रुडो हे समर्थ नाहीत, अशी टीका लिबरल पार्टीतूनच होऊ लागली. ट्रम्प यांनी कॅनडातून आयात होणार्या मालावर २५ टक्के आयात शुल्क लावणार असल्याची घोषणा केली आहे. ट्रुडो यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी पक्षातील दोन डझन खासदारांनी ऑक्टोबरमध्येच केली होती. येत्या ऑक्टोबरमध्ये कॅनडात संसदेची निवडणूक होणार आहे. यावेळी पियरे पोलिव्हिएर यांच्या नेतृत्वाखालील कन्झर्व्हेटिव्ह पक्ष ही निवडणूक जिंकेल, अशी शक्यता आहे. ते ट्रुडो यांना वारंवार लवकर निवडणुका घेण्याचे आवाहन करत आहेत. मात्र यावेळी लिबरल पार्टीला पराभूत करण्यासाठी झटू, असे सध्या या पक्षाचे पाठीराखे असलेल्या जगमित सिंग यांनी स्पष्टपणे सांगितले आहे. ट्रुडो पंतप्रधानपदावरून जाणे, हे भारताच्या दृष्टीने दिलासादायकच आहे. याचे कारण त्यांच्या राजवटीत उभय देशांच्या संबंधांमध्ये कटुता आली आहे. हरदीपसिंग निज्जर या कॅनेडियन नागरिकाची हत्या भारतानेच कट करून घडवून आणली, असा आरोप ट्रुडो यांनी संसदेत केला होता. खरे तर निज्जर हा कोणी पुण्यात्मा नव्हता, तर तो खलिस्तानवादी कट्टर दहशतवादी होता. कॅनडाने त्याच्या मुसक्या आवळून त्याला भारतात पाठवावे, अशी भारताची मागणी होती. कोणताही ठोस पुरावा नसताना, ट्रुडो यांनी हा आरोप केला. केवळ निज्जरच नव्हे, तर अनेक खलिस्तानवाद्यांना कॅनडाने आश्रय दिला होता व आहे. तेथून त्यांच्या भारतविरोधी कारवाया सुरू आहेत. तसेच कॅनडातील भारतीय वकिलात तसेच सामान्य नागरिकांनाही खलिस्तानवाद्यांनी लक्ष्य केले आहे. निज्जर प्रकरण तापल्यानंतर भारत व कॅनडाने एकमेकांच्या राजनैतिक अधिकार्यांची हकालपट्टी केली. ट्रुडो यांची नुसती ओरड सुरू असतानाच बि–टन, अमेरिका वा ऑस्ट्रेलिया या देशांनी मात्र भारतावर थेट आरोप केला नाही, हे सूचक आहे. लिबरल पार्टीला शिखांचा मोठा पाठिंबा असल्यामुळेच ट्रुडो यांनी निज्जरच्या मुद्द्यावरून भारताविरोधात राळ उठवली. वास्तविक निज्जर वा अन्य दहशतवादी हे शीख समुदायाचे प्रतिनिधी नव्हेत. तरीही त्यांची तळी उचलल्यास आपल्याला भारतीय शिखांचा पाठिंबा मिळेल, या समजुतीपोटीच ट्रुडो यांनी भारतद्वेषाचे राजकारण केले. कॅनडासारख्या प्रगत देशाने असे क्षुद्र राजकारण करणे, हे शोभादायक नाही. मात्र केवळ या मुद्द्यामुळे ट्रुडो यांना राजीनामा द्यावा लागलेला नाही; तर देशाचा कारभार हाताळण्यात ते साफ अपयशी ठरल्याचा हा परिपाक आहे. त्यांच्या राजीनाम्यामुळे कोणालाही दुःख होणार नाही!

# मकरसंक्रांतीला घरी बनवा सोप्या पद्धतीमध्ये गुळपोळी, आठवडाभर व्यवस्थित टिकून राहील पदार्थ



मकर संक्रांतीच्या दिवशी घरात अनेक पारंपरिक पदार्थ बनवले जातात. त्यामध्ये प्रामुख्याने गूळपोळी हा पदार्थ बनवला जातो. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला सोप्या पद्धतीमध्ये गुळपोळी बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत.

मकरसंक्रांतीच्या दिवशी तीळ गुळापासून वेगवेगळे पदार्थ बनवले जातात.संपूर्ण राज्यभरात वेगवेगळ्या पद्धतीने मकरसंक्रांती हा सण साजरा केला जातो. या दिवशी अनेक घरांमध्ये हळदीकुंक ठेवून वाण आणि तिळगुळाचे लाडू दिले जातात. महाराष्ट्रातील प्रत्येक गावात वेगवेग्ळ्या पद्धतीने मकरसंक्रांत साजरी केली जाते. तसेच यादिवशी अनेक घरांमध्ये पुरणपोळी प्रमाणे गुळाची पोळी बनवली जाते. आरोग्याच्या दृष्टीने गूळ अतिशय पौष्टिक आहे. थंडीच्या दिवसांमध्ये शरीरात उष्णता टिकवून ठेवण्यासाठी गुळाचे सेवन केले जाते. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला सोप्या पद्धतीमध्ये गूळ पोळी बनवण्याची रेसिपी सांगणार आहोत. अनेकदा गुळपोळी बनवताना त्यातील सारण बाहेर निघते आणि पोळी खराब होते. म्हणून आज आम्ही तुम्हाला गुळपोळी बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. चला तर जाणून घेऊया.(फोटो सौजन्य – )

साहित्य:

गूळ

तीळ

शेंगदाणे

तूप

बेसन

जायफळ पावडर

वेलची पावडर

तांदळाचे पीठ

गव्हाचे पीठ

मैदा

मीठ

कृती:

गुळपोळी बनवण्यासाठी सर्वप्रथम, कढई गरम करून त्यात शेंगदाणे व्यवस्थित भाजून नंतर बारीक कूट करून घ्या.

त्याच कढईमध्ये तूप टाकून गूळ वितळण्यासाठी ठेवा. गूळ पूर्णपणे वितळल्यानंतर त्यात तयार केलेला शेंगदाण्याचा कूट, वेलची पावडर, जायफळ पावडर टाकून व्यवस्थित सारण घट्ट होईपर्यंत परतून घ्या.

त्यानंतर ताटात मैदा, चवीनुसार मीठ, गव्हाचं पीठ आणि तांदळाचे पीठ टाकून मिक्स करून घ्या.


मिक्स करून घेतलेल्या पिठामध्ये आवश्यकतेनुसार पाणी घालून पीठ मळून घ्या. मळून घेतलेल्या पिठाला तेल लावून काहीवेळ ठेवा.

मळून घेतलेल्या पिठाचे छोटे छोटे गोळे करून त्यात सारण भरून घ्या.

त्यानंतर गुळाची पोळी हलक्या हाताने व्यवस्थित लाटून घ्या. तव्यावर टाकून दोन्ही बाजूने व्यवस्थित भाजून तूप लावून खाण्यासाठी सर्व्ह करा.

तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेली खमंग गूळपोळी.

# केस पिकून पांढरे झाले आहेत? मग काळ्याभोर केसांसाठी 'या' पद्धतीने करा कलौंजी बियांचा वापर, केस होतील सुंदर





तरुण वयात केस पांढरे झाल्यानंतर मुली केसांना हेअर कलर लावतात. मात्र हा हेअर कलर फारकाळ केसांवर टिकून राहत नाही. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला कलौंजी बियांचा वापर करून हेअर कलर बनवण्याची सोपी कृती सांगणार आहोत.

हल्ली कमी वयातच महिलांसह पुरुषांचे सुद्धा केस पांढरे होतात. केस पांढरे होण्यामागे अनेक कारण आहेत. केस काळे आणि लांबलचक ठेवण्यासाठी अनेक महिला सतत काहींना काही करत असतात. कधी केसांना हेअरमास्क लावणे तर कधी हेअर कलर केसांना लावला जातो. अनेक महिला थंडीच्या दिवसांमध्ये केसांची निगा राखण्यासाठी केसांना वेगवेगळ्या केमिकल ट्रीटमेंट करून घेतात, मात्र या केमिकल ट्रीटमेंटचा फारकाळ केसांवर प्रभाव टिकून राहत नाही. तसेच पांढरे झालेले केस काळे करण्यासाठी हेअर कलर करून घेतला जातो. मात्र केमिकल युक्त हेअर कलर फारकाळ केसांवर टिकून राहत नाही. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला पांढरे झालेले केस काळे करण्यासाठी कलौंजी बियांचा कशा प्रकारे वापर करावा, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. या पद्धतीने कलौंजी बियांचा वापर केल्यास काळेभोर आणि सुंदर होतील.(फोटो सौजन्य )

केसांच्या वाढीसाठी कलौंजी बिया वापरण्याचे फायदे:

दैनंदिन आहारात कलौंजी बियांचे सेवन केल्यास आरोग्याला अनेक फायदे होतील. या बियांमध्ये अँटीऑक्सिडेंट्स, ओमेगा-३, ओमेगा-६ फॅटीअसिड्स, विटामिन ए इत्यादी अनेक घटक आढळून येतात. या बियांचा वापर केल्यामुळे केस मजबूत आणि निरोगी राहण्यास मदत होते. अनेक महिला केसांच्या निरोगी वाढीसाठी कलौंजी बियांचा वापर करतात. यामुळे पांढरे केस काळे होण्यास मदत होते.

कलौंजी बियांपासून हेअर कलर तयार करण्याची कृती:

साहित्य:

कलौंजी बिया

आवळा पावडर

भृंगराज

दही

कृती:

कलौंजी बियांपासून हेअर कलर तयार करण्यासाठी सर्वप्रथम, पॅनमध्ये कलौंजी बिया व्यवस्थित भाजून घ्या. त्यानंतर भाजून घेतलेल्या बिया मिक्सरच्या भांड्यात टाकून बारीक वाटून घ्या. त्यानंतर वाटीमध्ये कलौंजी बियांची पावडर, आवळा पावडर, भृंगराज आणि दही टाकून व्यवस्थित मिक्स करून घ्या. तयार करून घेतलेला हेअर कलर केसांवर व्यवस्थित लावून घ्या. त्यानंतर ४० मिनिटं ठेवून केस पाण्याने स्वच्छ धुवा. यामुळे पांढरे केस काळे होण्यास मदत होईल. शिवाय केस लांबलचक आणि सुंदर दिसतील.

घरगुती हेअर कलर लावल्यामुळे केसांना होणारे फायदे:

केसांच्या वाढीसाठी आवळा अतिशय फायदेशीर आहे. आवळ्यामध्ये मुबलक प्रमाणात विटामिन सी आढळून येते, ज्यामुळे केसांची वाढ निरोगी होण्यास मदत होईल. आवळ्याचे सेवन केल्यामुळे केसांवर सकारात्मक परिणाम दिसून येतात. शिवाय दही केसांना मुलायम आणि चमकदार करण्यासाठी मदत करते. केसांच्या वाढीसाठी नियमित एका आवळ्याचे सेवन करावे.भृंगराज पावडरचा वापर केल्यामुळे केस तुटणे, केस गळणे इत्यादी अनेक समस्यांपासून आराम मिळण्यास मदत होते.

टीप – हा लेख केवळ सामान्य माहितीसाठी लिहिण्यात आला असून कोणत्याही प्रकारच्या उपचाराचा दावा यामध्ये करण्यात आलेला नाही. कोणताही उपाय करण्यापूर्वी आपल्या डॉक्टरांचा सल्ला घ्या आणि त्यांच्या सल्ल्यानुसारच योग्य बदलानुसार वापर करावा.

# कोलेस्ट्रॉल वाढल्यानंतर शरीरात दिसू लागतात 'ही' गंभीर लक्षणे, दुर्लक्ष केल्यास येऊ शकतो हृदयविकाराचा झटका



शरीरात वाढलेले उच्च कोलेस्ट्रॉल आरोग्यासाठी अतिशय घातक आहे. शरीरात कोलेस्ट्रॉलची पातळी वाढल्यानंतर योग्य वेळी लक्ष देऊन डॉक्टरांच्या सल्ल्याने औषध उपचार करावे. कोलेस्ट्रॉल वाढल्यानंतर शरीरात दिसून येतात ही लक्षणे.

शरीरासाठी कोलेस्ट्रॉल अतिशय महत्वाचे आहे. कारण शरीरात असलेले चांगले कोलेस्ट्रॉल निरोगी पेशी तयार करण्यासाठी अतिशय महत्वाचे आहे. शिवाय यामध्ये असलेले घटक शरीरातील रक्तभिसरणास चालना देतात. पण शरीरात खराब कोलेस्ट्रॉलची पातळी वाढल्यानंतर आरोग्याला हानी पोहचण्याची शक्यता असते. शरीराच्या नसांमध्ये जमा झालेले खराब कोलेस्ट्रॉल रक्तवाहिन्या ब्लॉक करतात. यामुळे आरोग्याला हानी पोहचण्याची शक्यता असते. शिवाय यामुळे हृदयविकाराचा झटका येण्याची शक्यता असते. रक्तवाहिन्यांमध्ये पिवळा रंगाचा जमा झालेला चिकट थर आरोग्याचे नुकसान करतो. त्यामुळे तेलकट किंवा तिखट पदार्थांचे अतिसेवन करणे टाळावे.(फोटो सौजन्य – )

खराब कोलेस्ट्रॉल शरीरात वाढल्यानंतर हृदयाच्या आरोग्याला धोका निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे आहारात पौष्टिक आणि शरीराला पचन होणाऱ्या पदार्थांचे सेवन करावे.कोलेस्ट्रॉलची पातळी वाढल्यानंतर हृदयविकाराचा झटका आणि स्ट्रोकचा धोका वाढण्याची शक्यता असते. अपुरी झोप, चुकीचा आहार, खाण्यापिण्याच्या सवयींमध्ये सतत होणारे बदल इत्यादी अनेक गोष्टींमुळे आरोग्य बिघडण्याची शक्यता असते. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला शरीरात उच्च कोलेस्ट्रॉलची पातळी वाढल्यानंतर कोणती लक्षणे दिसून येतात, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. ही लक्षणे शरीरात जाणवू लागल्यास तात्काळ डॉक्टरांच्या सल्ल्याने योग्य ते औषध उपचार करावे.

उच्च कोलेस्ट्रॉल वाढल्यानंतर शरीरात दिसून येणारी लक्षणे:

पायांमध्ये वेदना होणे:

शरीरात उच्च कोलेस्ट्रॉल वाढल्यानंतर पायांमध्ये वेदना होणे किंवा पायांमध्ये मुंग्या येणे इत्यादी अनेक समस्या उद्भवू लागतात. शिवाय रात्रीच्या वेळी शरीरात अनेक गंभीर लक्षणे जाणवू लागतात. कोलेस्ट्रॉलची पातळी वाढल्यानंतर शरीरातील रक्तभिसरण बिघडते, हातापायांमध्ये मुंग्या येणे, पाय दुखणे इत्यादी अनेक समस्या उद्भवू लागतात. त्यामुळे अधिक काळापासून जाणवत असलेल्या लक्षणांकडे दुर्लक्ष न करता डॉक्टरांच्या सल्ल्याने योग्य तो उपचार करावे.

पायांना सूज येणे आणि त्वचेमध्ये बदल होणे:

उच्च कोलेस्ट्रॉलची पातळी वाढल्यानंतर पायांना सूज येऊन त्वचेमध्ये बदल जाणवू लागतात.त्वचेमध्ये बदल होऊन पायांचा रंग बदलू लागतो. शरीराच्या रक्तवाहिन्यांमध्ये कोलेस्ट्रॉल वाढल्यानंतर आरोग्यावर नकारात्मक परिणाम होऊन पायांना सूज येऊ लागते. हातापायांच्या त्वचेमध्ये अनेक बदल होऊ लागतात. त्यामुळे या लक्षणांकडे दुर्लक्ष न करता आरोग्याची काळजी घ्यावी.

डोळ्यांमध्ये पिवळे खड्डे होणे:

कोलेस्ट्रॉल वाढू लागल्यानंतर डोळ्यांभोवती पिवळे खड्डे दिसू लागतात. डोळ्याभोवती फॅटी, पिवळे अडथळे दिसू लागतात. त्यामुळे डोळ्यांसंबंधित लक्षणे दिसू लागल्यानंतर डॉक्टरांच्या सल्ल्याने योग्य ते औषध उपचार करावे.

टीप – हा लेख केवळ सामान्य माहितीसाठी लिहिण्यात आला असून कोणत्याही प्रकारच्या उपचाराचा दावा यामध्ये करण्यात आलेला नाही. कोणताही उपाय करण्यापूर्वी आपल्या डॉक्टरांचा सल्ला घ्या आणि त्यांच्या सल्ल्यानुसारच योग्य बदलानुसार वापर करावा.

# १० तासांपेक्षा झोपणे ठरू शकते गंभीर, वंध्यत्व-डायबिटीससह ५ आजारांचा वाढतो धोका

१० तासांपेक्षा झोपणे ठरू शकते गंभीर, वंध्यत्व-डायबिटीससह ५ आजारांचा वाढतो धोका

जर तुम्हाला वाटत असेल की कमी झोप तुमच्यासाठी हानिकारक आहे, तर जास्त झोपेचादेखील आरोग्यावरही वाईट परिणाम होतो. यामुळे हृदयरोग, मधुमेह आणि मानसिक आरोग्याशी संबंधित अनेक समस्या उद्भवू शकतात

कमी झोपेचे दुष्परिणाम याबद्दल तुम्ही अनेक लेख वाचले असतील, पण तुम्हाला माहिती आहे का की जास्त झोपणे आरोग्यासाठी अनेक प्रकारे हानिकारक आहे. हो, हे खरं आहे की, जे लोक जास्त झोपतात त्यांना कमी झोपणाऱ्या लोकांसारख्या अनेक आरोग्य समस्यादेखील असू शकतात. त्याचा तुमच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर परिणाम होतो.

झोपेचे तास तुमच्या वयावरदेखील अवलंबून असतात. मुलांना, प्रौढांना किंवा प्रौढांना चांगल्या आरोग्यासाठी पुरेशी झोप घेण्याचा सल्ला दिला जातो. नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिनवर प्रकाशित झालेल्या एका अभ्यासानुसार एखाद्या व्यक्तीने दररोज नियमितपणे ७ किंवा त्याहून अधिक तास झोप घेतली पाहिजे. पण तुम्हाला माहिती आहे का की जर एखादी व्यक्ती दररोज १० तासांपेक्षा जास्त झोपत असेल तर त्याच्या शरीरात अनेक प्रकारचे आजार मूळ धरू शकतात.

तर, पुरेशी झोप शरीर आणि मनाला आराम देते आणि मेंदूची कार्यक्षमता वाढवते. त्याच वेळी, जास्त झोपल्याने आळस, लक्ष केंद्रित न होणे, डोकेदुखी, शरीर दुखणे आणि इतर समस्या उद्भवू शकतात. दररोज १० तासांपेक्षा जास्त झोपण्याचे तोटे काय आहेत ते जाणून घेऊया (फोटो सौजन्य – ळडींलज्ञ)

प्रजनन क्षमतेवर परिणाम

वंध्यत्वाचा होऊ शकतो धोका

रात्री जास्त वेळ झोपल्याने प्रजनन क्षमतेवरही वाईट परिणाम होतो. अनेक संशोधनातून असे दिसून आले आहे की जास्त झोपल्याने गर्भवती राहण्याची शक्यता कमी होते. तसंच अनेक महिलांना जास्त झोपल्याने वंध्यत्वाची समस्या निर्माण होते. प्रत्येक माणसाला दिवसातून केवळ ७-८ झोप पुरेशी आहे पण यापेक्षा अधिक झोपत असाल तर वंध्यत्वाच्या समस्येला तुम्हाला सामोरे जावे लागू शकते.

वजन वाढण्याची शक्यता

वजनही वाढू शकते

जास्त वेळ झोपल्याने तुम्हाला सुस्ती आणि थकवा जाणवतो, ज्यामुळे तुम्ही शारीरिकदृष्ट्या निष्क्रिय राहता आणि वजन वाढण्याची शक्यता वाढते. एकदा तुम्ही लठ्ठपणाला बळी पडलात की, तुमच्या शरीरात अनेक प्रकारचे आजार मूळ धरू शकतात. लठ्ठपणामुळे सतत आळस येणे आणि सतत खात राहण्याने अधिकाधिक आजार जोर धरतात हे नाकारता येत नाही

हृदयरोगाचा धोका

हृदयरोगाचा धोका उद्भवू शकतो

दररोज रात्री जास्त झोपल्याने हृदयरोगाचा धोका वाढतो. जॉन्स हॉपकिन्स मेडिसिनमध्ये प्रकाशित झालेल्या अहवालानुसार, जास्त झोपल्याने हृदयाच्या आरोग्यावर वाईट परिणाम होतो. यामुळे हृदयाशी संबंधित आजार होऊ शकतात. याशिवाय, १० तास किंवा त्याहून अधिक झोपल्याने स्ट्रोकमुळे मृत्यूची शक्यता ५६ टक्क्यांनी वाढते

मानसिक आजाराचा धोका

नैराश्याच्या गर्तेत जाऊ शकता

एवढेच नाही तर रात्री जास्त झोपल्याने मानसिक आरोग्यावरही वाईट परिणाम होतो. यामुळे नैराश्य येण्याची शक्यताही वाढते. नैराश्याने ग्रस्त असलेल्या लोकांना झोपेशी संबंधित अनेक समस्या असू शकतात. या परिस्थितीत, अनेक लोकांना कमी झोप येण्याची समस्या भेडसावते, तर सुमारे १५ टक्के लोकांमध्ये जास्त झोपण्याची प्रवृत्ती असते

डायबिटीसचा त्रास

जास्त झोपेमुळे डायबिटीस सुरू होण्याची शक्यता

अनेक संशोधनांमध्ये झोप आणि मधुमेह यांच्यातील संबंध आढळून आला आहे. कमी आणि जास्त झोप दोन्हीमुळे टाइप २ मधुमेहाचा धोका वाढू शकतो. हल्लीच्या राहणीमानामुळे हा धोका अधिक दिसून येतो आणि याला कारणीभूत तुम्ही घेत असलेली जास्त झोपही ठरू शकते असे अभ्यासात सांगण्यात आले आहे, हे लक्षात घ्या.

टीप – हा लेख केवळ सामान्य माहितीसाठी लिहिण्यात आला असून कोणत्याही प्रकारच्या उपचाराचा दावा यामध्ये करण्यात आलेला नाही. कोणताही उपाय करण्यापूर्वी आपल्या डॉक्टरांचा सल्ला घ्या आणि त्यांच्या सल्ल्यानुसारच योग्य बदलानुसार वापर करावा.

# भारतीय दलित पँथरच्या लातूर जिल्हाध्यक्षपदी धम्मानंद घोडके; महासचिवपदी संग्राम कदम





लातूर : भारतीय दलित पँथरच्या लातूर जिल्हाध्यक्षपदी रेणापूर येथील धडाडीचे कार्यकर्ते धम्मानंद घोडके यांची तर जिल्हा महासचिवपदी जळकोटच्या संग्राम कदम यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. ही निवड भारतीय दलित पँथरचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष एड. रमेशभाई खंडागळे यांनी घोषित केली आहे.

भारतीय दलित पँथरच्या जिल्हा कार्यकारिणीत पुढील पदाधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे. जिल्हा उपाध्यक्ष रुपेश गायकवाड ( लातूर ), महेंद्र आचार्य ( लातूर ग्रामीण ), सतीश वाघमारे ( उदगीर ), हरिश्चंद्र वाघमारे ( चाकूर ), गोविंद गायकवाड ( शिरूर अनंतपाळ ), जिल्हा संघटक सतीश मादळे ( शिरूर अनंतपाळ ), जिल्हा कोषाध्यक्ष नारायण गायकवाड ( रेणापूर ), जिल्हा प्रसिद्धी प्रमुख इतिहास कांबळे ( रेणापूर ), जिल्हा सांस्कृतिक प्रमुख धम्मपाल सावंत ( लातूर ), नितीन कांबळे ( अहमदपूर ). या कार्यकारिणीची निवड भारतीय दलित पँथरचे प्रदेश कार्याध्यक्ष संजयभाऊ कांबळे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या बैठकीत करण्यात आली. संजयभाऊ कांबळे यांच्या सक्षम व कुशल नेतृत्वाखाली लातूर जिल्ह्यात दलित पँथरची मजबूत फळी कार्यरत झाली आहे. नुकत्याच घोषित करण्यात आलेल्या या जिल्हा कार्यकारिणीतील सर्व पदाधिकारीही सामाजिक व राजकीय क्षेत्रातील अतिशय अनुभवी व जाणकार असल्याने जिल्ह्यातील सर्वच तालुक्यात येणाऱ्या काळात पँथरच्या शाखांची स्थापना करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे संजयभाऊ कांबळे यांच्या पुढाकाराने एड. शिवाजी आदमाने , एड. विजय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिराच्या माध्यमातून सर्व क्षेत्रात कार्यकर्ता प्रशिक्षित करण्यात येणार आहे.

भारतीय दलित पँथरच्या नूतन जिल्हा कार्यकारिणीचे प्रा. बालाजी आचार्य, नामदेव बामणे, निवृत्ती भाटकुळे , राजीव कांबळे, अजय शृंगारे , माधव बनसोडे, उत्तम कांबळे, राहुल सोनकांबळे, माधव काळे, जयपाल सोनकांबळे, सुभाष जोंधळे, यादव परतवाघ , सुनील वाघमारे, सुधाकर कांबळे, अश्वजीत शिरसाठ यांच्यासह सर्व पॅन्थर व सर्वच क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

## केंद्रीय राखीव पोलीस दल भरती प्रशिक्षण संस्थेत योग अभ्यास




लातूर, दि. ११ : केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या भरती प्रशिक्षण संस्थेत आज योग अभ्यास कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अधिकारी, कर्मचारी आणि त्यांचे कुटुंबिय यांच्या उपस्थित फिटनेस कार्यक्रमांतर्गत या योग अभ्यासाचे आयोजन करण्यात आले. योगाद्वारे शारीरिक आरोग्य, मानसिक शांती मिळविणे, तणाव कमी करणे आणि एकाग्रतेची क्षमता सुधारणे हा या कार्यक्रमाचा उद्देश होता.

केंद्रीय राखीव पोलीस दल भरती प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य तथा पोलीस उपमहानिरीक्षक अमीरुल हसन अन्सारी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम झाला. या मोहिमेत शासकीय मुले व मुलींच्या वसतिगृहातील विद्यार्थी, एनसीसी कॅडेट्स, शासकीय वसतिगृहांचे प्रमुख आणि आरटीसी, सीआरपीएफ, अधिकारी, जवान, प्रशिक्षणार्थी आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांनी सहभाग घेतला.

योग हे शरीर आणि मन निरोगी ठेवण्याचे एक प्रभावी साधन आहे. योगामध्ये केलेली आसने केवळ स्नायूंनाच बळकटी देत नाहीत, तर संपूर्ण शरीर उर्जेने भरतात. तसेच, योगामध्ये अवलंबलेले प्राणायाम आणि श्वासोच्छवासाचे तंत्र तणाव कमी करण्यास आणि मानसिक शांती प्रदान करण्यास मदत करते, असे श्री. अन्सारी यावेळी म्हणाले.

## तहसील कार्यालयात राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा



किनवट/शेख शौकत :–तहसील कार्यालयाच्या सभागृहात आज राष्ट्रीय ग्राहक दिनाच्या अनुषंगाने राष्ट्रीय ग्राहक दिन पंधरवाडा साजरा करण्यात आला.अध्यक्षस्थानी तहसीलदार डॉ. शारदा चोंडेकर या होत्या.प्रमुख पाहुणे म्हणून किनवट तालुका ग्राहक पंचायतीचे अध्यक्ष ड.मिलिंद सर्पे व स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे अध्यक्ष सुरेश कराड हे उपस्थित होते.

प्रारंभी स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आल्यानंतर कार्यक्रमाची सुरुवात झाली.प्रास्ताविक तालुका पुरवठा निरीक्षण अधिकारी निलेश राठोड यांनी केले.यावेळी बोलताना अँड.मिलिंद सर्पे यांनी ग्राहक पंधरवड्यानिमित्त ग्राहक संरक्षण कायद्याची माहिती व दिली व ग्राहक प्रबोधनात्मक विचार व्यक्त केले,तर सुरेश कराड यांनी समयोचित विचार व्यक्त केले.संचालन व आभार प्रदर्शन दत्तात्रय गड्डमवाड यांनी केले.

यावेळी पुरवठा निरीक्षक सतिश सरनाईक, सहाय्यक महसुली अधिकारी एम.डी मुगटकर,पुरवठा निरीक्षक करण गुसिंगे,महसुल सहाय्यक लिंबेश राठोड, विनोद सोनकांबळे यांच्यासह शिवाजी पाटील, सिद्धार्थ मुनेश्वर, मारोती आडे,जनार्धन पाटील,लतीफ भाई,अशोक अंधारे, सुरेश पाटील,केशव पवार,बापूराव राठोड,रामलु तिरनगरवार,काशिराम जाधव,राजु तरटे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

## केजचे भूमिपुत्र हारुणभाई इनामदार यांना २०२५ चा सर्वोच्च श्री वैद्यनाथ रत्न पुरस्कार जाहीर

### उद्देजरीं परळी येथे २३ फेब्रुवारी रोजी मान्यवरांच्या हस्ते हारुणभाई इनामदार यांना पुरस्काराने सन्मानित



केज/प्रतिनिधी :–केजचे भूमिपुत्र हारूणभाई इनामदार यांना २०२५ चा सर्वोच्च श्री वैद्यनाथ रत्न पुरस्कार जाहीर झाला आहे तर परळी येथे २३ फेब्रुवारी रोजी मान्यवरांच्या हस्ते हारुणभाई इनामदार यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. केज येथील जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख तथा समाजसेवेचा वसा घेतलेले हारुभाई इनामदार यांना पुरस्कार जाहीर झाला आहे. त्यांना दि.वा. संस्थान परळी वैजिनाथ यांच्या वतीने देण्यात येणारा सर्वोच्च श्री.वैद्यनाथ रत्न २०२५चा पूरस्कार जाहीर झाला आहे. सदर पुरस्कार हा २३ फेब्रुवारी २०२५ रोजी एका भव्य दिव्य कार्यक्रमांमध्ये मान्यवरांच्या शुभहस्ते देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. केजचे भूमिपुत्र हारून भाई इनामदार हे गेले वीस ते पंचवीस वर्षापासून सामाजिक, राजकीय क्षेत्रामध्ये सतत अग्रेसर राहून त्यांनी सतत आठर पगड जातीच्या समाज बांधवांची नाळ जोडून समाजकार्य व राजकीय क्षेत्रामध्ये अग्रेसर राहून गोरगरिबांचे अनेक प्रश्न मार्गी लावलेली आहेत. दि. वा. सेवा संस्थान परळी वैजनाथ हे संस्थान गेले पन्नास वर्षापासून सामाजिक क्षेत्रासह विविध क्षेत्रांमध्ये काम करत आहे त्याचबरोबर सर्व धर्मीय विवाह सोहळ्याचे काम देखील मोठ्या प्रमाणात हे संस्थान करत आहे. या संस्थांच्या वतीने दर तीन वर्षातून एकदा पंचक्रोशीती वैद्यनाथाच्या नावाने दिला जाणारा सर्वोच्च श्री वैद्यनाथ रत्न २०२५ हा सर्वोच्च पुरस्कार आजपर्यंत ज्या व्यक्तीने समाजकार्यामध्ये उत्कृष्ट कार्य केले अशा व्यक्तींना सदर पुरस्कार देण्यात येत आहे. या संस्थानाने इनामदार यांच्या कार्याची दखल घेत त्यांना २०२५ चा सर्वोच्च श्री वैद्यनाथ रत्न पुरस्कार जाहीर केला आहे. सदर संस्थानाच्या वतीने इनामदार यांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली या निवडीचे पत्र संस्थानाचे अध्यक्ष दीपक वांजरखेडे यांनी इनामदार यांना दिले आहे. हारुणभाई इनामदार यांना पुरस्कार जाहीर झाल्यामुळे सध्या त्यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. शिवाय केज शहरातील अनेक मान्यवरांसह विविध संस्थांनी त्यांचा सत्कार करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## शिक्षकांनी शिकविले आणि विद्यार्थी शिकले म्हणूनच 'लातूर पॅटर्न' घडला : प्रा. शिवराज मोटेगावकर




लातूर : संपूर्ण राज्यात अग्रेसर ठरलेला तसेच आजही ज्याची शैक्षणिक क्षेत्रात आवर्जून चर्चा होते,असा ' लातूर पॅटर्न' शिक्षकांनी शिकविल्याने आणि विद्यार्थी शिकल्यामुळे घडला असल्याचे प्रतिपादन लातूरच्या आरसीसी क्लासेसचे संचालक प्रा. शिवराज मोटेगावकर यांनी अखिल महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संयुक्त महामंडळ पुणेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मुख्याध्यापकांच्या ६१ व्या राज्यस्तरीय शैक्षणिक संमेलनात शुक्रवारच्या दुसऱ्या सत्रात बोलताना केले. लातूर येथील थोरमोटे लॉन्स येथे लोकनेते विलासराव देशमुख नगरीत पार पडणाऱ्या या दोन दिवसीय शैक्षणिक संमेलनाच्या दुसऱ्या सत्रात 'स्पर्धेच्या युगात पालकांची भूमिका व कर्तव्य ' या विषयावरील व्याख्यानात प्रा. शिवराज मोटेगावकर मार्गदर्शन करत होते. यावेळी राज्याचे माजी शिक्षण संचालक गोविंद नांदेडे , के.एस. ढोमसे, नंदकुमार बारवकर, दत्तात्रय कदम, मनोहर पवार, खंडेराव जगदाळे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. आपल्या व्याख्यानात प्रा. शिवराज मोटेगावकर यांनी शिक्षकांनी विद्यार्थी आणि पालक यांच्यातील दुवा म्हणून काम केले पाहिजे. विद्यार्थ्यांनी शिक्षकांकडून जास्त अपेक्षा ठेवाव्यात. तर शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे ध्येय निश्चित करून त्यांना शिक्षण देण्याचा प्रयत्न करायला हवा. शिक्षणाचा बहुचर्चित लातूर पॅटर्न उगाच नाही घडला. शिक्षकांनी शिकवल्याने आणि विद्यार्थी शिकल्याने तो घडू शकला. आपल्या पाल्याच्या अभ्यासातील प्रगतीबाबत पालक आणि शिक्षकांत चर्चा होणे अत्यंत आवश्यक आहे. आपला पाल्य नियमित अभ्यास करतो का ?, तो नियमित क्लासला, महाविद्यालयात उपस्थित असतो का ?, हेही पालकांनी पाहणे गरजेचे असते. आपण केलेले कष्ट, मेहनत आपल्या मुलाने करू नये अशी पालकांची धारणा असते. आई – वडिलांनी आपल्या पाल्याना मित्रत्वाच्या भावनेने विश्वासात घेऊन मार्गदर्शन केले पाहिजे,असे मोटेगावकर यांनी सांगितले.

यावेळी 'राष्ट्रीय शिक्षण धोरण – २०२० च्या अंमलबजावणीची दिशा ' या विषयावर आपले मनोगत व्यक्त करताना गोविंद नांदेडे यांनी मुख्याध्यापकांनी आपल्या जीवनात कसल्याही धोरणाला बळी पडू नये असे सांगितले. शिक्षक हा राष्ट्रनिर्मात्याची भूमिका पार पाडत असतो. राष्ट्रीय शिक्षण धोरण – २०२० च्या प्रभावी अंमलबजावणीने पाठांतराने विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता विकसित होऊ शकते. वर्ग अध्यापन केल्यास विद्यार्थ्यांना कोणत्याही गोष्टीची नक्कल करण्याची गरज पडत नाही. राष्ट्रीय शिक्षण धोरणात पाचही वर्ग एकत्रित आणले गेले आहेत. त्याचा विद्यार्थ्यांची बौद्धिक क्षमता वाढीसाठी खूप उपयोग होणार आहे. ग्रामीण भागाचा, खेड्यापाड्यांचा सर्वांगीण विकास करायचा असेल तर सर्वच शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रेरणा देऊन शिक्षण दिले पाहिजे. चांगल्या शिक्षणाने, मार्गदर्शनाने विद्यार्थी शिकून मोठा अधिकारी झाल्याशिवाय राहणार नाही व आपली शाळाही स्मार्ट होईल,असा विश्वास नांदेडे यांनी व्यक्त केला. यावेळी मुख्याध्यापक संघाचे सर्व पदाधिकारी, राज्याच्या विविध भागातून आलेले मुख्याध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुख्यमंत्री माझी सुंदर शाळा स्पर्धेत श्री.विठ्ठल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय सारणी (सा) प्रथम..!

### शाळेला मिळाले ३ लाखाचे पारितोषिक,केज तालुक्यातुन पटकावला प्रथम क्रमांक.!



केज/प्रतिनिधी मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा–२ मध्ये केज तालुक्यातून सारणी (सांगवी) येथिल श्री.विठ्ठल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने प्रथम क्रमांक पटकावला असून शाळेला ३ लाखांचे पारितोषिक मिळाले आहे. महाराष्ट्र शासनाच्या वतिने घेण्यात आलेल्या मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा –२ ची केज तालुकास्तरीय स्पर्धा नूकतीच तहसिलदार,गटविकास अधिकारी,गटशिक्षण अधिकारी यांच्या नेतृत्वात पार पडली. स्पर्धेत शाळेतील भौतिक सुविधा,विद्यार्थी गुणवत्ता,शाळेतील स्वच्छता आदी बाबींना धरून शाळेची निवड करण्यात येते. तालुकास्तरीय झालेल्या स्पर्धेत सारणी (सांगवी) येथिल श्री.विठ्ठल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने प्रथम क्रमांक पटकवला आसून शाळेला ३ लाखांचे पारितोषिक मिळाले आहे.दरम्यान गटशिक्षणाधिकारी लक्ष्मणजी बेडसकर,जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी सुनिलजी केंद्रे,जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी चाटे,केंद्रप्रमुख आयु. धम्मदीपा दरबारे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.विठ्ठल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय सारणी (सा) या शाळेने केज तालुक्यातून प्रथम क्रमांक पटकावला आसून शाळेने ३ लाख रुपयांचे पारितोषिक पटकावले आहे. शाळेच्या यशाबद्दल संस्थेचे कार्याध्यक्ष विक्रम बप्पा मुंडे,संस्थेचे अध्यक्ष विजयकांत मुंडे,सचिव अतुल मुंडे,प्राचार्या माधुरी मुंडे मॅडम सर्व खातेप्रमुख,यांनी प्राचार्य सचिन हांगे सर,पर्यवेक्षक उद्धव मुरकुटे सर,शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी,संपूर्ण स्टाफ यांचे विविध स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

## मराठवाडा शैक्षणिक महासंमेलनाच्या दुसऱ्या दिवशी मान्यवर व्याख्यात्यांनी केले विविध विषयांवर अभ्यासपूर्ण मार्गदर्शन

लातूर : लातूरच्या टाऊन हॉल मैदानावर लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसीय मराठवाडा शैक्षणिक महासंमेलनाच्या दुसऱ्या दिवशी शनिवारी मान्यवर व्याख्यात्यांनी विविध विषयांवर अभ्यासपूर्ण मार्गदर्शन करून उपस्थितांची मने जिंकली. या व्याख्यानाने विद्यार्थ्यांसह पालक , सर्व उपस्थितही अक्षरशः मंत्रमुग्ध झाल्याचे पाहायला मिळाले. व्याख्यानाच्या या कार्यक्रमात पुण्याच्या ज्येष्ठ मुक्त पत्रकार श्रीमती मुक्ता चैतन्य यांनी ' विद्यार्थ्यांचा मोबाईल वापर व नकळत घडणारे गुन्हे ' या विषयावरील व्याख्यानात विज्ञानाने केलेल्या प्रगतीच्या जोरावर आज विविध सोयी सुविधांनी परिपूर्ण असे मोबाईल उपलब्ध आहेत. कोरोना काळामध्ये विद्यार्थ्यांना शालेय अभ्यासही मोबाईलच्या माध्यमातून दिला जायचा. मोबाईल वापराचे जसे फायदे आहेत, तसेच त्याचे तोटेही आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर केवळ अभ्यासासाठी, ज्ञान संपादन करण्यासाठी करावा. मोबाईलच्या अतिवापराने दुष्परिणाम होऊन विद्यार्थ्यांचे भविष्य अंधकारमय होऊ शकते, असे सांगितले. कार्यक्रमाच्या प्रारंभी मराठवाडा शैक्षणिक महासंमेलनाचे अध्यक्ष ओमप्रकाश झुरळे,उपाध्यक्ष विजय सहदेव, सचिव प्रमोद भोयरेकर, कोषाध्यक्ष अमोल चव्हाण, संचालक विवेक सौताडेकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी यांनी श्रीमती मुक्ता चैतन्य, बार्शी येथील लोकव्याख्याते विशाल गरड , माजी कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर, माजी कुलगु डॉ. जनार्दन वाघमारे, सहायक पोलीस निरीक्षक दयानंद पाटील

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE